# मिरा भाईंदर महानगरपालिका

उद्यान विभाग
दुसरा मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र. २८१०३४०९

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. मनपा/उदयान/मिरारोड/ ९२६ /२०२३-२४ दिनांक : २५/१०/२०२३

## // जाहीर नोटिस सुचना //

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या प्रकरण पाच कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहिर करण्यात येते की, खालील नमुद तक्त्यातील झाडे काढणे करणेकामी प्रत्यक्ष पाहणी केली असता त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | वृक्षाचे नाव | अंदाजे उंची | संख्या | अदांजे वय | तपशील |
|---|---|---|---|---|---|
| **१) मा.शेख रुबिना फिरोज (नगरसेविका) मि.भा.म.न.पा यांचे दि.११/१०/२०२३ रोजीचे पत्र.** | | | | | |
| १ | कपाशी | ३५ ते ४० फुट | ०१ | १५ वर्ष | सदरचे झाड मिरारोड (पु.) फ्लायओव्हर च्या जवळ,मिरारोड स्टेशन जवळ टी.एम.टी बस स्टॉप जवळ मनपा रोड वर आहे.झाडाच्या खालच्या बाजुस उंदीर,घुशीने सगळीकडे पोखरलेले आहे तसेच बाजुला गटाराचे नवीन काम केलेले आहे त्यामुळे झाडाची मुळे वरती येऊन झाड एका बाजूस झुकलेल्या अवस्थेत दिसत आहे. झाडाचा वरच्या भागाचे वजन असून खालची बाजू पोकळ झाल्याने जोराच्या वाऱ्यांने पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच झाड स्टेशन रोड वर असून स्कायवॉक बाजुला असल्याने नागरिकांची येजा जास्त आहे. सदर झाड पडून जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव झाड मुळासहित काढणे आवश्यक आहे. |
| **२) प्रभाकर को.ऑ.हौ.सो.लि. यांचे दि.२७/०९/२०२३ रोजीचे पत्र.** | | | | | |
| १ | नारळ | ४० ते ४५ फुट | ०१ | २० वर्ष | सदरची झाडे प्रभाकर को.ऑ.हौ.सो.लि. जांगीड इस्टेट, विजय पार्क जवळ,मिरारोड (पु.) येथिल सोसायटीच्या आवारात असून झाडांची मुळे खालच्या बाजूस खोलवर वाढलेली आहेत. तसेच ड्रेनेज लाईन मध्ये झाडांची मुळे गेल्याने त्याचे पाणी ब्लॉक होत असून सोसायटीच्या आवारात दुर्गंधी पसरते. तसेच झाडे भिंतीवर झुकलेल्या अवस्थेत आहे त्यामुळे भिंतीला तडा गेलेला आहे.भिंत पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. जोराच्या वाऱ्याने झाडे पडून जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव सदरील झाडे मुळासहित काढणे आवश्यक आहे. |
| २ | पेल्ट्रोफॉर्म | ४५ ते ५० फुट | ०१ | १५ वर्ष | |

सदर प्रस्तावित वृक्ष तोडण्याची /स्थलातंरीत करण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबाबत नागरिंकाच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहिर सुचना प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात उप-आयुक्त (उद्यान विभाग), मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे किंवा garden@mbmc.gov.in किंवा mbmc.garden@gmail.com या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. तसेच मुदतीनंतर प्राप्त होणा-या हरकती/सुचनांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

(योगेश गुणिजन)
**सहाय्यक आयुक्त**
**तथा वृक्ष अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

2023-2024. Sadar -Permission